THE INDIAN EXPRESS, SATURDAY, MARCH 26, 2022
THE CITY

## Sri Sri Ravi Shankar honored with Suryadatta National Lifetime Achievement Award



World-renowned spiritual guru Sri Sri Ravi Shankar, Founder, The Art of Living, was honored with the prestigious "The Saint of Modern India Suryadatta National Lifetime Achievement Award 2022" by Suryadatta Group of Institutes during the Kissan Samruddhi Mahotsav organized at the Art of Living Headquarters, Bengaluru. Acharya Dr. Lokeshji, Founder of Ahimsa Vishwa Bharati, Governor of Karnataka Shri Thawar Chand Gehlotji, Union Minister Gajendra Singh Shekhawat were also present on this occasion.

Professor Dr. Sanjay B. Chordiya, Founder & President, Suryadatta Education Foundation said that like every year, this year also we selected personalities of the country who will be honored with national and international awards of Suryadatta Group.

Suryadatta Group is feeling proud by conferring "The Saint of Modern India" Suryadatta National Life Time Achievement Award 2022 to the main spiritual guru Sri Sri Ravi Shankarji.

On this occasion, Mrs. Sushama S. Chordiya was also present.

शनिवार । दि. २६ मार्च २०२२ ■ PRABHAAT | Press Registration No. 1639/1957, Year 91, Is

प्रभात

# ऋषी, कृषीचे सर्वांना एकत्र बांधून ठेवण्याचे संस्कार

## 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चे संस्थापक श्री श्री रविशंकर यांचे प्रतिपादन

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २५ -** भारत हा ऋषी व कृषीचा देश आहे. ऋषींनी मंत्र आणि कृषी परंपरा दिली असून, देशाला विकासाच्या मार्गावर नेण्यासाठी, पृथ्वीला सुंदर स्वर्ग बनविण्यासाठी त्यांनी शिकवण दिली. ऋषी व कृषीने आपल्याला एकत्र बांधून ठेवण्याचा संस्कार दिला आहे. हाच संस्कार जपत देशहितासाठी एकात्मिक कार्य उभारण्याची गरज आहे, असे प्रतिपादन 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चे संस्थापक श्री श्री रविशंकर यांनी केले.



सुर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटतर्फे दिला जाणारा 'द सेंट ऑफ मॉडर्न इंडिया-सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार' देऊन श्री श्री रविशंकर यांना सन्मानित करण्यात आले. कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी केंद्रीय जलशक्ती मंत्री गजेंद्र सिंह शेखावत, आचार्य डॉ. लोकेश मुनीजी, सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया आदी उपस्थित होते.

आचार्य लोकेश मुनीजी म्हणाले, अठ्ठेचाळीस नद्यांचे पुनर्जीवन करून शेतकऱ्यांना, सामान्यांना पाणीदार करणाऱ्या श्री श्री रविशंकर यांचे कार्य आदर्शवत आहे.

डॉ. संजय चोरडिया म्हणाले, जगभर शांततेचा, प्रेमाचा संदेश देत समाजमन घडवणाऱ्या श्री श्री रविशंकरजी यांना हा पुरस्कार प्रदान करताना आमचाच सन्मान वाढला आहे. ज्यांच्या मुखात सरस्वती नांदतेय, अशा गुरुजींचा आधुनिक भारताचे संत म्हणून गौरव करताना आम्हाला अभिमान वाटत आहे. प्रेम, करुणा, माया यातून रविशंकरजी यांनी जगभर शांततेचा, अहिंसेचा प्रसार केला आहे.

लोकसत्ता
८ शुक्रवार, २५ मार्च २०२२ WWW.LOKSATTA.COM

# 'देशहितासाठी एकात्मिक कार्य उभारण्याची गरज'

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** भारत हा ऋषी आणि कृषीचा देश आहे. ऋषींनी मंत्र आणि कृषी परंपरा दिली आहे. देशाला विकासाच्या मार्गावर नेण्यासाठी, पृथ्वीला सुंदर स्वर्ग बनवण्याची त्यांनी शिकवण दिली आहे. ऋषी आणि कृषीने आपल्याला एकत्र बांधून ठेवण्याचा संस्कार दिला आहे. हाच संस्कार जपत देशहितासाठी एकात्मिक कार्य उभारण्याची आवश्यकता आहे, असे मत आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक, आध्यात्मिक गुरु श्री श्री रविशंकर यांनी मांडले.

सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटतर्फे श्री श्री रविशंकर यांना कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत यांच्या हस्ते 'सेंट ऑफ मॉडर्न इंडिया - सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार २०२२' प्रदान करण्यात आला. बंगळुरुतील आर्ट ऑफ लिव्हिंगच्या आश्रमात झालेल्या कार्यक्रमाला केंद्रीय जलशक्तीमंत्री गजेंद्रसिंह शेखावत, आचार्य डॉ. लोकेश मुनीजी, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया आदी उपस्थित होते.

रविशंकर म्हणाले, जलस्रोत, भूगर्भातील पाणीपातळी वाढवण्यावर आपण भर दिला पाहिजे. भारताची कृषी व्यवस्था सर्वोच्च स्थानावर पोहोचण्यासाठी योगदान देण्याचा संकल्प प्रत्येकाने केला पाहिजे.

जगभर शांततेचा, प्रेमाचा संदेश देत समाजमन घडवणाऱ्या रविशंकर यांना आधुनिक भारताचे संत म्हणून गौरव करताना अभिमान वाटतो. प्रेम, करुणा, माया यातून रविशंकर यांनी जगभर शांततेचा, अहिंसेचा प्रसार केल्याचे डॉ. चोरडिया यांनी सांगितले.

महाराष्ट्र टाइम्स

FRONT PAGE - 2

। पुणे । शुक्रवार, २५ मार्च २०२२

# ‘सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार २०२२’चे वितरण

पुणे : ‘शिक्षण संस्थांमधून ज्ञानाबरोबरच संस्कारही मिळायला हवेत. ‘सूर्यदत्त’सारख्या संस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देत आहेत. समाजातील आदर्श व्यक्तिमत्त्वाचा सन्मान करण्याचा उपक्रम विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा आहे. समाजहितासाठी, विश्वाच्या कल्याणासाठी आपण प्रत्येकाने योगदान द्यायला हवे,’ असे प्रतिपादन कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी केले. जीवनमूल्यांच्या अनुकरणातूनच भारताचे उज्ज्वल भविष्य घडेल, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या २४व्या स्थापना दिनानिमित्त सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटतर्फे ‘सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार’ आणि ‘सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार’ देऊन गेहलोत यांच्या हस्ते विविध क्षेत्रांतील मान्यवरांना गौरविण्यात आले. बावधन (पुणे) येथील सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या कॅम्पसमधील सूर्यभवन येथे झालेल्या या सोहळ्याला अहिंसा विश्व भारतीचे संस्थापक अध्यक्ष आचार्य डॉ. लोकेश मुनिजी, भजनसम्राट अनुप जलोटा, ‘सूर्यदत्त’चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया, उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया, कार्यकारी विकास अधिकारी सिद्धांत चोरडिया, संचालक स्नेहल नवलाखा, सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सच्या संचालक डॉ. किमया गांधी उपस्थित होते. विविध क्षेत्रांतील मान्यवर; तसेच शिक्षक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.




**सूर्यदत्त ‘द सेंट ऑफ मॉडर्न इंडिया’ ‘सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार २०२२’ प्रदान करताना (डावीकडून) सुषमा चोरडिया, आचार्य लोकेश मुनीजी, कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत, श्री. श्री. रविशंकरजी, प्रा. डॉ. संजय चोरडिया, गजेंद्रसिंह शेखावत आदी.**

‘सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार’ प्रशासकीय सेवेतील कार्याबद्दल निवृत्त पोलिस महानिरीक्षक डॉ. विठ्ठल जाधव, पर्यावरण संवर्धनातील कार्याबद्दल कर्नल (नि.) सुरेश पाटील, सूक्ष्म, लघु व माध्यम उद्योगातील बदलांसाठी योगदान दिल्याबद्दल ‘जीतो’चे संस्थापक ललित गांधी, सहकार व सामाजिक उद्योजकता क्षेत्रातील कार्याबद्दल सुरेश कोते, वैद्यकीय सामाजिक सेवेबद्दल डॉ. राजेश गादिया, मानवता व बंधुतेच्या प्रसारासाठी बंधुताचार्य प्रकाश रोकडे, जागतिक उद्योग आणि सीएसआर क्षेत्रातील कार्यासाठी मुकेश मोदी यांना प्रदान करण्यात आला.

‘सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार’ ‘बीव्हीजी’चे व्यवस्थापकीय संचालक हणमंतराव गायकवाड (कॉर्पोरेट एक्सलन्स), उद्योजक चंद्रकांत साळुंके (एसएमई प्रोत्साहन), रोटेरियन डॉ. सिमरन जेठवानी (महिला सक्षमीकरण, दीपस्तंभ फाउंडेशनचे संस्थापक यजुर्वेंद्र महाजन (सामाजिक कार्य), सौरभ बोरा (आर्थिक व आध्यात्मिक सेवा), सॉलिसिस लेक्सचे व्यवस्थापकीय भागीदार ॲड. अमित मेहता (कायदा व न्यायव्यवस्था) आणि ग्लोबल डिजिटल मीडिया तज्ज्ञ भाव्या श्रीवास्तव यांना प्रदान करण्यात आला.




**सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार २०२२ सोहळ्याप्रसंगी गझलसम्राट अनुप जलोटा, प्रा. डॉ. संजय ब. चोरडिया, कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत, आचार्य लोकेश मुनीजी, सुषमा चोरडिया हे मान्यवर उपस्थित होते.**




**सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या २४व्या वर्धापनदिनानिमित्त ‘सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार २०२२’ केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांना प्रा. डॉ. संजय चोरडिया यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.**

पुण्य नगरी

मंगळवार, २९ मार्च २०२२

## सूर्यदत्तच्या राष्ट्रीय पुरस्कारांचे वितरण




पुणे : सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या २४ व्या स्थापना दिवसानिमित्त सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटतर्फे 'सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार' व 'सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार' कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत यांच्या हस्ते देऊन विविध क्षेत्रातील मान्यवरांना गौरविले. यामध्ये निवृत्त पोलीस महानिरीक्षक डॉ. विठ्ठल जाधव, कर्नल (नि.) सुरेश पाटील, ललित गांधी, सुरेश कोते, डॉ. राजेश गादिया, प्रकाश रोकडे, मुकेश मोदी तसेच हणमंतराव गायकवाड, चंद्रकांत साळुंके, डॉ. सिमरन जेठवानी, यजुर्वेंद्र महाजन, सौरभ बोरा, अॅड. अमित मेहता व भाव्या श्रीवास्तव यांचा समावेश होता. बावधनमधील कॅम्पसच्या सूर्यभवनमध्ये हा सोहळा झाला. यावेळी डॉ. लोकेश मुनिजी, अनुप जलोटा, प्रा. डॉ. संजय चोरडिया, उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया, सिद्धांत चोरडिया, स्नेहल नवलखा, डॉ. किमया गांधी उपस्थित होते.

पुणे, 23 फरवरी 2022
नवभारत
सदैव अपने पाठकों के साथ

# सिलाई प्रशिक्षण से बढ़ेगी उत्पादकता



**पुणे,** नवभारत न्यूज नेटवर्क. सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इंस्टीट्यूट द्वारा संचालित सूर्यदत्ता वूमेन एम्पॉवरमेंट एंड लीडरशिप एकेडमी की (स्वेला) तथा सेवा सारथी फाउंडेशन के सहयोग से ग्राम उरवडे में महिला बचत गुटों को निःशुल्क सिलाई मशीन का वितरण किया गया तथा उन्हें सिलाई का प्रशिक्षण भी दिया गया. इस समय संस्था की उपाध्यक्ष सुषमा चोरडिया ने कहा कि सिलाई प्रशिक्षण से महिलाओं की उत्पादकता बढ़ेगी. सामाजिक कार्यों के लिए संस्था हमेशा अग्रसर रहती है.

## समाजसेवा में संस्था अग्रसर : सुषमा

सुषमा ने कहा कि छात्रवृत्ति, अनाज और कपड़ों का वितरण किया जाता है. संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया के मार्गदर्शन में आयोजित इस उपक्रम के समय कार्यकारी संचालक प्रा. सुनील धाडीवाल, अमित तोडकर, कल्पना शिंदे, धनश्री पिसे, उरवडे ग्राम पंचायत के पदाधिकारी एवं सदस्य, मीर शेलार, वैभव मुरकुटे, मंगला खोपकर, संगीत भिंगारे, प्रशांत मुंडे आदि उपस्थित थे.

दै. बातम्यांचा राजा
जनप्रवास

शुक्रवार दि. १८ फेब्रुवारी २०२२



# 'सूर्यदत्त'कडून सातत्याने समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन

पुणे
जनप्रवास प्रतिनिधी

सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट संचालित सूर्यदत्त वुमेन एम्पॉवरमेंट अँड लीडरशिप अकॅडमीच्या (स्वेला) वतीने आणि सेवा सारथी फाउंडेशनच्या सहकार्याने उरवडे गावातील महिला बचत गटांना मोफत शिलाई मशीन वाटप व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या भागातील महिला बचत गटांच्या सदस्यांनी मोठ्या संख्येने या प्रशिक्षण कार्यक्रमात भाग घेतला. 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या उपक्रमावेळी संस्थेच्या उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, कार्यकारी संचालक प्रा. सुनील धाडीवाल, सेवा सारथी फाउंडेशनचे अमित तोडकर, मार्गदर्शिका कल्पना शिंदे, धनश्री पिसे, उरवडे ग्रामपंचायतीचे आजीमाजी पदाधिकारी व सभासद, समीर शेलार, वैभव मुरकुटे, मंगला खोपकर, संगीत भिंगारे, प्रशांत मुंडे आदी उपस्थित होते.

लोकमान्य सांजवार्ता

मंगळवार, दि. १५ फेब्रुवारी २०२२

# 'सूर्यदत्ता'तर्फे उरवडे गावातील महिला बचत गटांना मोफत शिलाई मशीन वाटप



पुणे : सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट संचालित सूर्यदत्त वुमेन एम्पॉवरमेंट अँड लीडरशिप अकॅडमीच्या (स्वेला) वतीने आणि सेवा सारथी फाउंडेशनच्या सहकार्याने उरवडे गावातील महिला बचत गटांना मोफत शिलाई मशीन वाटप व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या भागातील महिला बचत गटांच्या सदस्यांनी मोठ्या संख्येने या प्रशिक्षण कार्यक्रमात भाग घेतला.

'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या उपक्रमावेळी संस्थेच्या उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, कार्यकारी संचालक प्रा. सुनील धाडीवाल, सेवा सारथी फाउंडेशनचे अमित तोडकर, मार्गदर्शिका कल्पना शिंदे, धनश्री पिसे, उरवडे ग्रामपंचायतीचे आजीमाजी पदाधिकारी व सभासद, समीर शेलार, वैभव मुरकुटे, मंगला खोपकर, संगीत भिंगारे, प्रशांत मुंडे आदी उपस्थित होते. सुषमा चोरडिया म्हणाल्या, सूर्यदत्त संस्था नेहमीच समाजकार्यात पुढाकार घेते. तळागाळातील लोकांसह, गरजू व प्रज्ञावंत लोकांना साहाय्य करण्याच्या भावनेतून संस्थेचे काम सुरु आहे. नॉलेज बँक, फूड बँक, क्लोदिंग बँक अशा विविध उपक्रमातून शिष्यवृत्ती, अन्नधान्य, कपड्यांचे व इतर साहित्याचे वाटप करण्यात येते. रिक्षावाले, रेल्वेस्टेशनवरील श्रमजीवी यांच्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतो. एज्यु-सोशियो उपक्रमांतर्गत महिला सक्षमीकरण व समाजोपयोगी उपक्रम घेण्यात येतात.याआधीही संस्थेने अशा प्रकारचे उपक्रम राबवले आहेत. आगामी काळात मुळशी आणि हवेली तालुक्यातील गावांत शिलाई मशीन वाटप व प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

उपलब्ध करून देण्यात आलेल्या शिलाई मशीनचा योग्य वापर व्हावा, चांगले प्रशिक्षण घेऊन उत्पादकता वाढवावी, मिळणाऱ्या उत्पन्नातून घरखर्चाला हातभार लावावा, अशी अपेक्षा सुषमा चोरडिया यांनी व्यक्त केली. या उपक्रमाच्या यशानंतर बचत गटांना इतर साधने उपलब्ध करून दिली जातील, असे आश्वासन त्यांनी दिले. प्रा. सुनील धाडीवाल यांनी 'सूर्यदत्त'मध्ये असलेल्या केजी टू पीजी अभ्यासक्रमांतील प्रगती विशद केली.

दैनिक भारत डायरी
पुणे, 21 फरवरी 2022

# सूर्यदत्त द्वारा उरवडे गांव में महिला स्वयं सहायता समूहों को निःशुल्क सिलाई मशीन का वितरण एवं प्रशिक्षण कार्यक्रम



पुणे : सूर्यदत्त ग्रुप ऑफ इंस्टीट्यूट्स द्वारा संचालित सूर्यदत्त वुमेन एम्पॉवरमेंट अँड लीडरशिप अकॅडमी (स्वेला) और सेवा सारथी फाउंडेशन के संयुक्त तत्वावधान में उरवड़े गांव के महिला स्वयं सहायता समूहों को मुफ्त सिलाई मशीन वितरण और प्रशिक्षण कार्यक्रम का आयोजन किया गया. इस प्रशिक्षण कार्यक्रम में बड़ी संख्या में महिला सदस्यों ने भाग लिया। 'सूर्यदत्त' के संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया के मार्गदर्शन में हुए इस कार्यक्रम में सूर्यदत्त की उपाध्यक्ष सुषमा चोरडिया, कार्यकारी निदेशक प्रा. सुनील धाडीवाल, सेवा सारथी फाउंडेशन के अमित तोडकर, प्रशिक्षण कार्यक्रम की मार्गदर्शिका कल्पना शिंदे, धनश्री पिसे, उरवडे ग्रामपंचायत के पदाधिकारी एवं सदस्य समीर शेलार, वैभव मुरकुटे, मंगला खोपकर, संगीत भिंगारे, प्रशांत मुंडे आदि उपस्थित थे।

सुषमा चोरडिया ने कहा, "सूर्यदत्त संस्था हमेशा सामाजिक कार्यों में अग्रणी भूमिका निभाती है। जमीनी स्तर पर लोगों सहित जरूरतमंद और बुद्धिमान लोगों की मदद करने की भावना से संस्था का काम शुरू है।

नॉलेज बैंक, फूड बैंक, क्लोदिंग बैंक जैसी विभिन्न गतिविधियों के माध्यम से छात्रवृत्ति, खाद्यान्न, कपड़े और अन्य सामग्री का वितरण किया जाता है। रेलवे स्टेशनों पर मजदूर और रिक्शा चालकों के लिए प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित किए जाते हैं। एज्यु-सोशियो उपक्रम में महिला सशक्तिकरण और सामुदायिक सेवा शामिल है।" "संस्था पहले भी इस तरह के उपक्रम कर चुकी है। भविष्य में, मुळशी और हवेली तालुका के गांवों में सिलाई मशीन वितरण और प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित किया जाएगा। प्रदान की गई सिलाई मशीन का ठीक से उपयोग किया जाना चाहिए, अच्छे प्रशिक्षण के माध्यम से उत्पादकता बढ़ाना और अर्जित आमदनी से घरेलू खर्चों में योगदान देना चाहिए।

लोकमान्य सांजवार्ता

सोमवार, दि. २१ फेब्रुवारी २०२२

# सूर्यदत्तामध्ये आयोजित कर्करोग तपासणी, जागरूकता शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे (प्रतिनिधी) :** सूर्यदत्ता एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेसतर्फे (एसआयएचएस) नुकतेच संस्थेच्या बावधन येथील कॅम्पसमध्ये मोफत कर्करोग तपासणी, प्रतिबंधतता आणि जागरूकता शिबिराचे आयोजन केले होते. सुर्यदत्ता एज्युकेशन फाउंडेशनच्या २४ व्या वर्धापनदिनाच्या, तसेच जागतिक कर्करोग दिनाच्या निमित्ताने आयोजित 'हेल्थ अवेरनेस मंथ' या अनोख्या उपक्रमाअंतर्गत हे शिबिर घेण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

प्रसिद्ध कर्करोग तज्ज्ञ डॉ. शैलेश पुणतांबेकर यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले. प्रसंगी सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, अधिष्ठाता व संचालक प्रा. सुनील धाडीवाल, प्राचार्य प्रा. डॉ. सिमी रेठरेकर, डॉ. कल्याणी शिवरकर, डॉ. कांचन घोडे, डॉ. नेहा भोसले, दंतचिकित्सक डॉ. अर्पिता धोपडे, स्त्रीरोगतज्ञ डॉ. दीप्ती सालेर, फिजिशियन डॉ. किरण जोगवाडे, उमाकांत उपाध्याय, प्रेमलता राघव, जगजीत सिंग, अक्षय देटके आदी उपस्थित होते.




या शिबिरात तोंडाचा, स्तनाचा, प्रोस्टेट, फुफ्फुसाचा, रक्ताचा, माणक्याचा कर्करोग याची तपासणी यासह मॅमोग्राफी, रक्तातील साखरेचे प्रमाण, इतर रक्त तपासणी करण्यात आली. अत्याधुनिक, सर्व संसाधनांनी सुसज्ज अशा मोबाईल युनिट व्हॅन शिबिरामध्ये होती. फिजिशियन, स्त्रीरोगतज्ज्ञ, दंत चिकित्सक, फिजिओथेरपीस्ट, भुलतज्ज्ञ, कर्करोग तज्ज्ञांच्या उपस्थितीत हे शिबीर झाले.

सुर्यदत्ता संस्थेतील सर्व स्टाफ, १४ वर्षांवरील विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी, भागधारकांनी या शिबिरात सहभाग घेतला. जवळपास १२० लोकांनी कर्करोग तपासणी करून घेतली. सुर्यदत्ता संस्थेच्या परिसरातील नागरिक स्वयंसेवी संस्थांचे सभासद, बावधनसह मुळशी, हवेली आणि मावळ तालुक्यातील लोकांनी यात सहभाग नोंदवला. ललित गांधी व संदीप भंडारी यांनी तपासणी मोबाईल व्हॅन उपलब्ध करून दिली.

दैनिक
भारत डायरी
पुणे, 15 फरवरी 2022

# कैंसर का निदान, जागरूकता के लिए एज्युकेशन इंस्टीटयूट जांच, जागरूकता शिविर का आयोजन करे : प्रा. डॉ. संजय चोरडिया



पुणे : सूर्यदत्त एजउकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त इंस्टीट्यूट ऑफ़ हेल्थ सायन्स (एसआईएचएस) द्वारा हाल ही में बावधान कैम्पस में मुफ्त कैंसर जांच, प्रतिबन्ध और जागरूकता शिविर का आयोजन किया गया था। सुर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन की २४ वे वर्षगांठ और वर्ल्ड कैंसर दिवस के अवसर पर यह शिविर आयोजित किया गया. परिसर के लोगों से इस शिविर को अच्छा रिस्पांस मिला.

प्रसिद्ध ऑन्कोलॉजिस्ट डॉ. शैलेश पुणतांबेकर के हाथो इस शिविर का उद्घाटन हुआ. इस समय सूर्यदत्त ग्रुप ऑफ़ इन्स्टिट्यूट के संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, अधिष्ठाता व संचालक प्रा. सुनील धाडीवाल, प्राचार्य प्रा. डॉ. सिमी रेठरेकर, डॉ. कल्याणी शिवरकर, डॉ. कांचन घोडे, डॉ. नेहा भोसले, डेंटिस्ट डॉ. अर्पिता धोपडे, गायनोकोलॉजिस्ट डॉ. दीप्ती सालेर, फिजिशियन डॉ. किरण जोगवाडे, उमाकांत उपाध्याय, प्रेमलता राघव, जगजीत सिंग, अक्षय देटके आदी उपस्थित थे.

इस शिविर में मुँह, स्तन, प्रोस्टेट, लंग्ज, ब्लड, सर्वाइकल कैंसर की जांच की गई. साथ ही मॅमोग्राफी, खून में शुगर का प्रमाण और अन्य जांच किये गए. एडवान्स्ड तकनीक के साथ लाई गई मशीनरी और मोबाईल व्हॅन के साथ फिजिशियन, गायनेकोलॉजिस्ट, डेंटिस्ट, फिजिओथेरपीस्ट, एनेस्थिसियोलॉजिस्ट और ऑन्कोलॉजिस्ट की उपस्थिति में यह शिविर हुआ.इस शिविर में सूर्यदत्त संस्था के सभी कर्मचारी, १४ वर्ष से अधिक आयु के छात्र, पूर्व छात्र, माता-पिता और उनके परिवार के सदस्य, हितधारकों ने भाग लिया। लगभग १२० लोगों को कैंसर का पता चला था। बावधान के साथ मुलशी, हवेली और मावल तालुका के लोगों, सूर्यदत्त संस्था के आसपास के गैर सरकारी संगठनों के सदस्यों ने भाग लिया। ललित गांधी व संदीप भंडारी ने मोबाईल व्हॅन प्रदान की। स्वास्थ्य जांच शिविर कोरोना के सभी नियमों का पालन करते हुए लगाया गया। स्वास्थ्य जांच शिविर कोरोना के सभी नियमों का पालन करते हुए लगाया गया।डॉ. शैलेश पुणतांबेकर ने कहा, ''स्पाइनल कैंसर, ब्रेस्ट कैंसर जल्दी होने की संभावना अधिक होती है।

Postal Registration Number PCW/109/2018-2020

# पुणे सत्ता

संपादक : नरेंद्र शंकर पारखे
मो. : 8698783400
E-mail : punesatta@gmail.com

■ RNI. NO.: MAHMAR/2012/41393
■ DECL NO/: SDM/PUNE/SR/31/2020

■ पुणे, गुरुवार, दि. १७ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी २०२२ ■ मुल्य : २ रु ■ पाने ४

## 'सूर्यदत्त'तर्फे उरवडे गावातील महिला बचत गटांना मोफत शिलाई मशीन वाटप व प्रशिक्षण कार्यक्रम

पुणे : सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट संचालित सूर्यदत्त वुमेन एम्पॉवरमेंट अँड लीडरशिप अकॅडमीच्या (स्वेला) वतीने आणि सेवा सारथी फाउंडेशनच्या सहकार्याने उरवडे गावातील महिला बचत गटांना

मोफत शिलाई मशीन वाटप व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या भागातील महिला बचत गटांच्या सदस्यांनी मोठ्या संख्येने या प्रशिक्षण कार्यक्रमात भाग घेतला.

'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या उपक्रमावेळी संस्थेच्या उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, कार्यकारी संचालक प्रा. सुनील धाडीवाल, सेवा सारथी फाउंडेशनचे अमित तोडकर, मार्गदर्शिका कल्पना शिंदे, धनश्री पिसे, उरवडे ग्रामपंचायतीचे आजीमाजी पदाधिकारी व सभासद, समीर शेलार, वैभव मुरकुटे, मंगला खोपकर, संगीत भिंगारे, प्रशांत मुंडे आदी उपस्थित होते.



सुषमा चोरडिया म्हणाल्या, "सूर्यदत्त संस्था नेहमीच समाजकार्यात पुढाकार घेते. तळागाळातील लोकांसह, गरजू व प्रज्ञावंत लोकांना साहाय्य करण्याच्या भावनेतून संस्थेचे काम सुरु आहे. नॉलेज बँक, फूड बँक, क्लोदिंग बँक अशा विविध उपक्रमातून शिष्यवृत्ती, अन्नधान्य, कपड्यांचे व इतर साहित्याचे वाटप करण्यात येते. रिक्षावाले, रेल्वेस्टेशनवरील श्रमजीवी यांच्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतो. एज्यु-सोशियो उपक्रमांतर्गत महिला सक्षमीकरण व समाजोपयोगी उपक्रम घेण्यात येतात."

याआधीही संस्थेने अशा प्रकारचे उपक्रम राबवले आहेत. आगामी काळात मुळशी आणि हवेली तालुक्यातील गावांत शिलाई मशीन वाटप व प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येणार आहे. उपलब्ध करून देण्यात आलेल्या शिलाई मशीनचा योग्य वापर व्हावा, चांगले प्रशिक्षण घेऊन उत्पादकता वाढवावी, मिळणाऱ्या उत्पन्नातून घरखर्चाला हातभार लावावा, अशी अपेक्षा सुषमा चोरडिया यांनी व्यक्त केली. या उपक्रमाच्या यशानंतर बचत गटांना इतर साधने उपलब्ध करून दिली जातील, असे आश्वासन त्यांनी दिले.

प्रा. सुनील धाडीवाल यांनी 'सूर्यदत्त'मध्ये असलेल्या केजी टू पीजी अभ्यासक्रमांतील प्रगती विशद केली. तसेच संस्थेच्या १०० टक्के निकाल, विविध उपक्रम, वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार, विविध संस्थांकडून 'सूर्यदत्त'ला मिळालेले पुरस्कार व मान्यता याविषयी माहिती सांगितली.

जनप्रवास

मंगळवार, दि. २२ फेब्रुवारी २०२२

# कर्करोग निदान, जागरूकतेसाठी शिक्षणसंस्थांनी तपासणी शिबिरे आयोजित करण्याचे प्रा. डॉ. संजय चोरडिया यांचे आवाहन




पुणे
जनप्रवास प्रतिनिधी

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेसतर्फे (एसआयएचएस) नुकतेच संस्थेच्या बावधन येथील कॅम्पसमध्ये मोफत कर्करोग तपासणी, प्रतिबंधतता आणि जागरूकता शिबिराचे आयोजन केले होते. सुर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या २४ व्या वर्धापनदिनाच्या, तसेच जागतिक कर्करोग दिनाच्या निमित्ताने आयोजित 'हेल्थ अवेरनेस मंथ' या अनोख्या उपक्रमाअंतर्गत हे शिबिर घेण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

प्रसिद्ध कर्करोग तज्ज्ञ डॉ. शैलेश पुणतांबेकर यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले. प्रसंगी सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, अधिष्ठाता व संचालक प्रा. सुनील धाडीवाल, प्राचार्य प्रा. डॉ. सिमी रेठरेकर, डॉ. कल्याणी शिवरकर, डॉ. कांचन घोडे, डॉ. नेहा भोसले, दंतचिकित्सक डॉ. अर्पिता धोपडे, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. दीप्ती सालेर, फिजिशियन डॉ. किरण जोगवाडे, उमाकांत उपाध्याय, प्रेमलता राघव, जगजीत सिंग, अक्षय देटके आदी उपस्थित होते.